Historicity Research Journal
Volume 1 | Issue 12 | Aug 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

# पेशवे काळातील कर्तबगार महार

**अनिल कठारे**

इतिहास विभाग प्रमुख, श्री शिवाजी कॉलेज, कंधार जि. नांदेड

**प्रस्तावना :**

महार लोक मुळातच शूरवीर होते. शिवकाळात लष्करात त्यांचाच अधिक भरणा होता. मुसलमानी अमदानीत आणि शिवकाळात त्यांनी शौर्य गाजवून शत्रूला आपल्या तलवारीचे पाणी पाजले. पेशव्यांच्या सेवेत महारांची स्वतंत्र लष्करी पथके होती. पेशवाईत रणांगणावर शौर्य गाजविणाऱ्या व्यक्तींना उडत रुमाल अशी बहुमानाची पदवी देण्याचा प्रघात रुढ होता. उडत रुमाल हा शब्द मूळचा मानपध्दतीचा द्योतक आहे. ज्या व्यक्तीने मोठा पराक्रम गाजविलेला असेल अशा वीराच्या भोवती लोकांनी उभे राहायचे व त्याचा जयजयकार करीत त्याच्या डोक्यावर मोर्चे व पांढरे रुमाल उडवायचे असा हा बहुमान असे. हा मान फक्त महार शूरवीरांनाच असे, असे इतिहास संग्रहात म्हटले आहे. परंतु हा बहुमान केवळ महार लोकांसाठीच काढलेला नव्हता, "जंजिऱ्याच्या स्वारीच्या प्रसंगी बीरवाडीकडील नावजी मराठे व होनाजी लकवडे या मराठा शूरवीरांनाही हाच मान दिलेला होता."[१] पेशव्याच्या लष्करात हुलस्वार[२] म्हणून महाराचे एक पथक असे. याशिवाय पेशवेकाळात हूजूर पागेत महार व मांग लोकांची आणि आरमाराकडे चांभाराची नेमणूक करण्यात येत असे. इ.स. १७७५-७६ मध्ये हुजर पागेत पेशव्याच्या घोडदळासाठी वेठबिगारी कामे करण्यासाठी तालुका हवेली संगमनेर येथून ३० महार, १० मांग, १० चांभार व ५ जिनगर, परगणा पारनेर येथून ४० महार, १० मांग व १० चांभार, तालूका राहूरी येथून १० महार, तालुका खेड येथून ९ महार, ३ मांग व ३ चांभार, प्रांत जुन्नर येथून १० महार ५ मांग व ५ चांभार, परगणे गांडापूर येथून ७५ महार, १० मांग व १० चांभार आणि तालुका बेलापूर येथून १० महार[३] लोकांना बोलविले होते. तसेच इ.स. १७५०-५१ मध्येही हुजूर पागेत काम करण्यासाठी प्रांत जुन्नर येथून ९२ महार, १० मांग व १० चांभार, गंगथडी प्रांतातून ५० महार, पुणे प्रांतातून ६० महार, परगणा करकंब येथून २५ महार व परगणा भोसा येथून २५ महार[४] लोकांना सरकारने बोलाविले होते. महार लोक लढाईत जखमी झालेल्या सैनिकांना[५] परत आणायचेही काम करीत असत. इ.स. १७७८ मध्ये तळेगाव येथून लष्करातील जखमी लोक पुणे येथे परत आणण्यासाठी पेशव्याने पाठविलेला सैनिकामध्ये महारांचाही[६] समावेश होता.

**१) मराठ्यांची जंजिरा मोहीम आणि कोंडनाक महाराचे शौर्य :**

सिध्दी हे मूळ आफ्रिकेतील ॲबिसिनिया या देशाचे मूळ रहिवाशी असून ते कट्टर मुसलमान होते. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर त्यांच्या वसाहती होत्या. दंडराजपुरी व जंजिरा ही दोन महत्त्वाची ठिकाणे त्यांच्या ताब्यात होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६५९ साली कल्याण व भिवंडी जिंकल्यानंतर सिद्दीचा पराभव करण्यासाठी बाजी पासलकर यांना पाठविले होते. पासलकरांनी सिद्दीचा पराभव केला होता. याच बाजी पासलकरांचे अंगरक्षक येल्या मांग आणि खंड्या महार[७] होते.

पहिल्या बाजीराव पेशव्याने साम्राज्यविस्ताराचे धोरण स्वीकारले होते. त्यामुळे मराठ्यांचा सिद्दीबरोबर संघर्ष होते. तेथे ब्रह्मेंद्रस्वामींचा मुक्काम होता. त्यांनी चिपळूणजवळ परशुरामाचे एक नवे मंदिर बांधले. ब्रह्मेंद्रस्वामी हे पेशव्यांचे गुरु होते. अंजनवेलचा सुभेदार सिद्दी सात याने इ.स. १७२७ मध्ये ब्रह्मेंस्वामीनी बांधलेले परशुरामाचे मंदिर उद्ध्वस्त केल्यामुळे पहिल्या बाजीराव पेशव्याने त्याचा बदला घेण्याचे ठरविले. त्यानुसार इ.स. १७३३ मध्ये पेशव्याने सिद्दी सात याच्या बंदोबस्तासाठी चिमाजी आप्पास पाठविले. रेवस जवळ शराई या ठिकाणी झालेल्या लढाईत सिद्दी सात ठार झाला. जंजिऱ्याच्या या मोहिमेत कोंडनाक[८] महाराने सिद्दी सात याच्या बाजुने लढून मोठे शौर्य गाजविले.

**२) वसईचा रणसंग्राम आणि तुकनाक महाराचा पराक्रम :**

इ.स. १५१० मध्ये पोर्तुगीजांची पहिली वसाहत गोवा येथे स्थापन झाली. यानंतर त्यांनी दमण आणि दिव बेटावरही आपले वर्चस्व स्थापन केले. उत्तर कोकणात चौल पासून दमणपर्यंत किनारपट्टीवरही पोर्तुगीजांनी आपले वर्चस्व स्थापन केले होते. कोकणात सिद्दीचा बंदोबस्त केल्यानंतर पहिल्या बाजीरावने पोर्तुगीजांवर आपले लक्ष केंद्रीत केले. कारण पोर्तुगीज लोकही हिंदूवर अन्याय अत्याचार करीत होते. ते हिंदूना जबरदस्तीने ख्रिस्ती धर्माची दीक्षा देत असत. तसेच त्यांनी अनेक मंदिरे पाडून तेथे चर्चेस बांधली होती. पहिल्या बाजीरावाने वसईची मोहीम शंकराजी पंत आणि गंगाजी नाईक यांच्यावर सोपविली व तो स्वत: उततर हिंदुस्थानच्या स्वारीवर निघुन गेला. पण शंकराजी पंत व गंगाजी नाईक यांना वसई जिंकता न आल्यामुळे बाजीरावने १७३९ मध्ये पोर्तुगीजांविरुध्द मोहीम सुरु केली. या मोहीमेचे सेनापतीपद चिमाजी आप्पाकडे देण्यात आले. चिमाजी आप्पाने मोठे शोर्य गाजवून वसईचा किल्ला[९] जिंकून घेतला. वसईच्या या मोहीमेत चिमाजी आप्पाबरोबर महार लोकही लढत होते. तुकनाक महाराने[१०] मांडवीकडील मोर्चा उत्तमरीतीने लढविला व खरे यश मिळविले. या नामांकित लढवय्याला त्याच्या कर्तबगारीबद्दल कंठी, कडी व तोडे अशी मोठी बक्षीसे देऊन पेशव्याने त्याचा गौरव केला. याच मोहिमेत उत्तम पोहणारे पेटेकरी महार व मांग होते. त्यांनी वसईच्या वेढ्याच्यावेळी माणसे, पत्रे व इतर सामान पाण्यातून पोहोचविण्याचे मोठे अवघड काम केले होते. त्यामध्ये सिता महार, फकिरा महार, बिरा महार, याण व हंसा महार[११] या महार सैनिकांचा समावेश होता.

**३) शिराळे गुमट येथील लढाईत महार जखमी :**

इ.स. १७५२ साली शिराळे गुमट येथील लढाईचा वृत्तांत केदारजी केसकर यांनी मल्हार खंडेराव चिटणीस यांना पाठविलेल्या, पत्रात दिला असून आपल्याकडील बरेच लोक जखमी व ठार झाल्याचेही पत्रात नमूद केले आहे. याच लढाईत महार प्यादे गोळी लागून जखमी झाले होते, त्याचाही उल्लेख पत्रात करण्यात आला आहे.

“इकडील वर्तमान तरी मंगळवारी त्रितीये प्रहरी शिराळे गुमट येथे हाला जाहाली, आम्हास निराळी एक बाजू दिली तेव्हा चालोन घेतले. हाती नेऊन गावकुसास लावीला निंबाजी भोसला ठार झाला. केरोजी नाईक प्यादा चाकरास गोळी मांडीवर लागली. चिमाजी शामजी यास वानावरी गोळी लागली. तिधे तेथेच पडिले. फार मारा झाला. मुर्दे निघेनात यैसे झाले. तेव्हा लाहाने व खंडनाक यांनी जोरावारीने चिमाजीस घेऊन आले. चिमाजीची गोळी पाठीवर कापून काडली जिवंत आहेत. निंबाजी भोसला व केरोजी नाईक जागाच राहिले. हातीच्या माहातास हातावर गोळी लागली. निशानवारदार यांस गालावर भाला लागला व हातीस तीन चार भाले लागले. तरवारेच्या जखमा व गोळीच्या जखमा येशा दहाबारा जखमा लागल्या. संताजी व महार प्यादे तिघे यांसी गोळीच्या जखमा लागल्या. नामाजी नाईक यांस धोंडा लागला व सिंग्यास तीर लागला.”[१२]

**४) खर्ड्याच्या लढाईत सिदनाक महाराचा पराक्रम :**

हैदराबादच्या निजाम आणि मराठे यांच्यात पारंपारिक वैर होते. याशिवाय १७१८ मधील सय्यदांच्या तहापासून मराठ्यांच्या चौथाई व सरदेशमुखीचे ओझे निजामावर होते. चौथाईची बाकी तीन कोटीपर्यंत वाढली होती. त्याची मागणी सवाई माधवराव पेशव्याच्या काळात निजामाकडे करण्यात आली. पण ती देण्यास निजामाने टाळाटाळ केली. त्यामुळे पेशव्याने निजामाला धडा शिकविण्याचे ठरविले. पेशव्याने युध्दाची जय्यत तयारी सुरु केली. अनेक मराठा सरदार आपल्या लष्करासह पेशव्याच्या सैन्याला येऊन मिळाले. त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील कळंबी या गावचा सिदनाक महार सुध्दा आपल्या लष्करी पलटणीसह पेशव्याच्या सैन्याला येऊन मिळाला. खर्ड्याच्या रणांगणांवर जमलेल्या मराठा सैन्याच्या मध्यभागी सिदनाक महाराची पलटण पाहून बऱ्याच ब्राह्मण व मराठा सरदारांनी पेशव्याकडे तक्रार केली. पण हिरोजी पाटणकरांनी ही जेवणाची पंगत नव्हे तर शूरांची पंगत आहे. ज्याची तलवार खंबीर तो हंबीर अशा शब्दात ठणकावून उत्तर दिले. ११ मार्च १९७५ रोजी खर्ड्याच्या रणांगणावर मराठे व निजाम यांच्यात झालेल्या लढाईत, सिदनाक महाराने फार मोठे शौर्य गाजविले. परशुराम पटवर्धन यांच्यावर चालून आलेल्या पठाणांच्या त्याने खांडोळ्या केल्या. अशारितीने खर्ड्याच्या लढाईत मराठ्यांना विजय मिळवून देण्यात सिदनाक महाराचा सिंहाचा वाटा हाता हे विसरता येत नाही.

**५) माणिक महाराचे शौर्य :**

इ.स. १७५१ ते १७६३ या काळात सलाबतजंग हा हैदराबाद राज्याचा निजाम होता. सालाबातजंग हा केवळ नाममात्र शासक होता. त्यामुळे राज्यकारभार काबीज करण्यासाठी सलाबतजंगाचे भाऊ निजामअल्ली हे प्रयत्नशील होते. शेवटी निजामअली यानी सलाबतजंग याच्याकडून राज्यकारभार स्वत:कडे घेतला. पेशवे व निजामाचे मुळातच शत्रुत्व होते. सलाबतजंग आणि निजामअली यांच्यातील सत्तास्पर्धेमुळे निजामाचे राज्य अस्थिर बनले होते. याचा फायदा घेऊन नानासाहेब पेशव्याने सदाशिवरावभाऊ आणि विश्वासराव यांना निजामाच्या राज्यावर हल्ला करण्याचा आदेश दिला. त्यानुसार या दोघांनी निजामाच्या राज्यात प्रवेश करुन तेथील प्रदेश ताब्यात घेण्यास प्रारंभ केला. त्यामुळे मराठा - निजाम युध्द सुरु झाले २६ जानेवारी १७६० रोजी उदगीर येथे झालेल्या ( तांदुळजा ) लढाईत निजामअलीच्या सैन्याचा पार धुव्वा उडविला. आपला पराभव होत आहे याची जाणीव होताच निजामअली आपला जीव वाचविण्यासाठी इकडे तिकडे पळू लागला. अशा संकटप्रसंगी रणांगणावर लढत असलेला माणिक महार हा त्याच्या मदतीला धावून गेला. माणिक महाराने निजामअलीस आपल्या खांद्यावर घेतले आणि तो रणांगण सोडून रातोरात प्रवास करुन पहाटे गोदावरी नदी ओलांडून राक्षसभुवन येथे येऊन पोहोचला. अशा प्रकारे माणिक महाराने निजामअलीस उदगीरच्या रणांगणातून बाहेर काढून राक्षसभूवन या सुरक्षित ठिकाणी आणून त्याचा जीव वाचविला. या थोर कामगिरीबद्दल निजामअलीने त्याची खुप प्रशंसा व स्तूती केली. परंतु तो हाच आडमार्ग, चोरमार्ग, शत्रुलाही दाखविल म्हणून निजामाने त्यास ठार मारले. माणिक महाराने उदगीरहून ज्या मार्गाने निजामअलीस राक्षसभुवन येथे आणले तो मार्ग आज माणिकदंड या नावाने ओळखला जातो.

**संदर्भ सूची**

१) खैरमोडे चांगदेव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र, खंड १, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे ३० चौथी आवृत्ती ऑक्टोबर १९९२, पृ.१८८.
२) कित्ता, पृ.१८९.
३) वाड, पारसनीस, पेशवे रोजनिशी, खंड ३, नोंद २६५.
४) कित्ता, ५.
५) वाड ग.चि. व डी.बी. पारसनीस ( संपादक ), सवाई माधवराव पेशवे रोजनिशी, खंड १, नोंद ४३.
६) कित्ता, भाग २, पृ.४३.

७) खैरमोडे चांगदेव, उपरोक्त, पृ.१८९.
८) पेशवे दप्तर सनदापत्रातील माहिती ३०४, द.ब. पारसनीस, ब्रह्मेंद्रस्वामी धावडसीकर चरित्र व पत्रव्यवहार, निर्णयसागर प्रेस मुंबई १८६७, लेख २७०.
९) सरदेसाई जी.एस., न्यू हिस्ट्री ऑफ द मराठा, खंड २, फोनिक्स पब्लीकेशन, मुंबई १९७१, पृ.१८१ ते ८६.
१०) खैरमोडे चांगदेव, उपरोक्त, पृ.१८९.
११) सरदेसाई जी.एस. ( संपादक ), पेशवे दप्तर, खंड ३, नोंद २०९.
१२) पवार आप्पासाहेब ( संपा.), ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड ३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७२, पत्र क्र. ५७, पृ.७०.
१३) शिंदे वि.रा., भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, नवभारत ग्रंथालय, नागपूर, १९३३, पृ. १९२.